PUNYA NAGRI

Sunday, Feb 21, 2010.

# आयएमटी विजेते, तर व्हीएनआयटी उपविजेते

## टाटा क्रुसीयल क्वीझ

नागपूर, दि. २० (प्रतिनिधी) - 'टाटा क्रुसीबल कॅम्पस क्वीझ-२०१०' च्या सहाव्या चरणाच्या स्पर्धेला नागपूर येथील प्रादेशिक फेरीने सुरुवात झाली. मेंदूला चालना देणाऱ्या या चुरशीच्या चढाओढीमध्ये आयएमटी महाविद्यालयाचे नेहा कटियाल व सौम्यजित सामंता विजेते ठरले. व्हीएनआयटी संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.




टाटा क्रुसीबल कॅम्पस क्वीझच्या यावर्षीच्या सत्रात नागपूरसह मणिपाल, रांची आणि गुवाहाटी या चार नवीन शहरांचा समावेश करण्यात आला असून आता ही स्पर्धा यंदा २० शहरांमध्ये पोहोचली आहे. सगळ्यात प्रतिभावान तरुणांना भारतातील सगळ्यात कठीण बिझनेस क्वीझमध्ये एकत्रित आणणे, हाच या स्पर्धा आयोजनामागचा हेतू आहे. आव्हानात्मक व नवीन फॉर्मेटमध्ये असलेल्या प्रश्नमंजूषा स्पर्धेत पाच फेऱ्या असून त्यात स्पर्धकांच्या तार्किक व कारणमीमांसा क्षमतेची तसेच विचारशक्तीच्या गतीची कसोटी लागते. या नागपूर प्रादेशिक फेरीत विविध भागातून साधारण १३० संघ सहभागी झाले होते आणि त्यात आयएमटी कॉलेजचे नेहा कटियाल व सौम्यजित सामंता- हा विजेता संघ ठरला. आता हा संघ मुंबईत एप्रिल महिन्यात होणाऱ्या अंतिम फेरीत देशभरातील इतर प्रादेशिक विजेत्यांसमोर उभा ठाकणार आहे. या प्रश्नमंजूषेचे सूत्रसंचालन क्वीझमास्टर गिरी बालसुब्रमण्यम ऊर्फ पिकब्रेन यांनी केले. प्रमुख पाहुणे व्हीएनआयटीचे रजिस्ट्रार भास्कर गणवीर यांच्या हस्ते विजेत्या संघाला ७५ हजार रुपये रोख, तर उपविजेत्यांना ३५ हजार रुपयांची रोख पारितोषिके प्रदान करण्यात आली. यावेळी गणवीर म्हणाले की, ही खऱ्या अर्थाने सत्त्वपरीक्षा आहे. या स्पर्धेतील क्वीझमास्टरने समोर ठेवलेले आव्हान पेलण्याचा हा अनुभव या मुलांसाठी नवी उमेद देऊन जाणारा होता.